**प्रेसनोट** दि. 26/09/2025

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे घटकाकडून हवेली तालुक्यातील तीन महिला तलाठयांविरूध्द लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खडक पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय 42 वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | 1) श्रीमती प्रेरणा बबन पारधी, वय - 30 वर्षे, तलाठी सांगरूण, हवेली, पुणे, रा. फ्लॅट न. 7s, 2/4A, जी सोसायटी, गुलमोहर पार्कजवळ, पाषाण, पुणे, (वर्ग- 3 )<br>2) श्रीमती दिपाली दिलीप पासलकर, वय 29 वर्ष , तलाठी बहुली,हवेली, पुणे रा.लेन न.4, स्वामी समर्थनगर, कोंढवा, काकडेनगर, पुणे 48, (वर्ग- 3 )<br>3) श्रीमती शारदादेवी पुरूषोत्तम पाटील, वय 40 वर्षे,तलाठी खडकवाडी कुडजे, हवेली, पुणे रा.सर्व्हे न.57/1, कृष्णकुंज सोसायटी, मोरे वस्ती, सोलापूर रोड, मांजरी बु,पुणे (वर्ग-3) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | आ.लो.से. 1 यांनी रू. 12,400/-(सोळा हजार चारशे), आ.लो.से. 2 यांनी रू.4,910/- (चार हजार नवशे दहा), आ.लो.से.3 यांनी रू.1,520/- (एक हजार पाचशे वीस) |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | 1) आलोसे क्र.1 यांनी तक्रारीपुर्वी 4000/- रुपये स्विकारल्याचे कबुल करून आणखी 12,400/- रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>2) आलोसे क्र. 2 यांनी तक्रारदाराकडे 6500/- रुपये लाच रकमेची मागणी करून ती रक्कम ही आलोसे क्रमांक 1 यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.<br>3) आलोसे क्र. 3 यांनी तक्रारीपूर्वी तक्रारदाराकडून 1500/- रुपये स्वतःसाठी घेतल्याचे कबूल करून आणखी 2000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. |
| स्वीकारलेली लाच रक्कम | आ.लो.से.क्र. 3 यांनी रू. 2,000/- (दोन हजार) रुपये लाच रक्कम स्विकारली. |
| पडताळणी दिनांक | 19/09/2025 |
| सापळा दिनांक | 25/09/2025 |
| ठिकाण | तहसिलदार, हवेली कार्यालयासमोर, खडकमाळ, पुणे. |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 7722011255) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. खंडेराव रंजवे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9923486428) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांना मौजे सांगरून, बहुली, खडकवाडी आणि कुडजे ता.हवेली या गावाच्या हद्दीतील जमीन खरेदी विक्री करण्यासाठी पुणे शहराच्या लगतच्या प्रस्तावित रिंग रोड मध्ये अधिग्रहित झालेल्या जमिनीच्या 7/12 तसेच 8 अ उताराचे संगणकीकृत तसेच हस्तलिखित साक्षांकित प्रती हव्या होत्या. त्यासाठी ते मौजे सांगरूळ ता. हवेली येथे कार्यरत असलेल्या तलाठी आलोसे क्र. 1 श्रीमती प्रेरणा पारधी, मौजे बहुली ता. हवेली येथील तलाठी आलोसे क्र. 2 श्रीमती दिपाली पासलकर तसेच मौजे खडकवाडी, कुडजे ता. हवेली येथील तलाठी आलोसे क्र. 3 श्रीमती शारदा देवी पाटील यांना भेटले त्यावेळी तक्रारदार यांना आवश्यक असलेल्या 7/12 व 8 अ उताऱ्याच्या मौजे सांगरुन गावातील 240 प्रतीसाठी तलाठी श्रीमती पारधी यांनी सरकारी फी व्यतिरिक्त रू. 16,400 रुपयाची लाच मागत आहेत, मौजे बहुली गावातील 106 प्रतिसाठी संबंधित गावचे तलाठी श्रीमती दिपाली पासलकर या सरकारी फी व्यतिरिक्त 4,910/- रुपयाची लाच मागत आहेत तसेच खडकवाडी व कुडजे गावातील एकूण 32 प्रतीसाठी त्या गावचे तलाठी श्रीमती शारदा देवी पाटील या सरकारी फी व्यतिरिक्त 1520 रुपयांची लाच मागत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दि.19/09/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथे दिली होती.

तक्रारदाराच्या वरील तक्रारीच्या अनुषंगाने दि.19/9/2025 रोजी आलोसे क्र. 1, 2 व 3 यांचेकडे पडताळणी केली असता 1) आलोसे क्र.1 यांनी तक्रारदाराकडून तक्रारीपुर्वी 4000/- रुपये स्विकारल्याचे कबुल करून आणखी 12,400/- रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले, 2) आलोसे क्र. 2 यांनी तक्रारदाराकडे 6500/- रुपये लाच रकमेची मागणी करून ती रक्कम ही आलोसे क्रमांक 1 यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले, 3) आलोसे क्र. 3 यांनी तक्रारीपूर्वी तक्रारदाराकडून 1500/- रुपये स्वतःसाठी घेतल्याचे कबूल करून आणखी 2000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर दि. 25/9/2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान आ.लो.से.क्र.3 श्रीमती शारदादेवी पाटील यांना तहसीलदार हवेली यांच्या कार्यालयासमोर रस्त्यावर तक्रारदाराकडून रू. 2,000/- (दोन हजार रुपये) लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले वरील तिन्ही आरोपी लोकसेवक यांच्याविरूद्ध खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर या ठिकाणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

Scanned with CamScanner

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823137154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक -** 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट -** www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

सहायक पो.आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो

26/9/25
(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.
(मोबाईल क्रमांक- 9423884745)

Scanned with CamScanner